VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# नागपूरकर भोसले कालीन टाकसाळ व्यवस्था

**प्रा. डॉ. बाबुसिंग जोतिराम राठोड**
सहा. प्राध्यापक इतिहास विभाग,
मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय,
सालेकसा ता. सालेकसा जि. गोंदिया

**प्रस्तावना :-**

नागपूर प्रांताच भौगोलिक रचनेमध्ये भिन्नता आहे. शून्य मैलाचा आरंभ करणारे नागपूर शहर भारताच्या केंद्रस्थानी आहे, म्हणून साहजिकच प्राचीन काळापासून इतिहासाच्या सर्व कालावधीत या प्रांताचे महत्व राजकर्त्यांना वाटत होते. नागपूर प्रांत हा भारताच्या हृदयस्थानी आहे. आजचा नागपूर जिल्हा २०°३५ व २१°४४ सेल्सिअस उत्तर दक्षिण, ७८ अंश सेल्सिअस १५,७९ अंश सेल्सियस ४० पूर्व रेखांश दरम्यान आहे.

भोसल्यांच्या काळात असलेला नागपूरर प्रांत हा कोणत्याही दृष्टीने एकजिनसी नव्हता. भौगोलिक रचना, भाषा, पूर्वेतिहास वगैरे सर्व भिन्न होते. नागपूरकर भोसले व पुढे इंग्रजांच्या काळात वेगळे प्रांत, मुलुख त्यांच्या वर्चस्वाखाली येत गेले आणि ते नागपूर प्रांताचा भाग बनत गेला. इ.स. १८०३ च्या इंग्रज-मराठा आडगांवच्यायुध्दापूर्वी नागपूरकर भोसल्यांच्या वर्चस्वाखाली साधारणतः समोरील प्रदेश होता- विदर्भ प्रांत, गोंडवाना, गडामंडला, रेवा, छत्तीसगड, सरगुजा, संबलपूर, बस्तर हे मध्य प्रदेशातील तसेच ओरिसा, कटकपर्यंतचा प्रदेश दुसऱ्या रघुजी भोसल्यांच्या नियंत्रणाखाली होता.

**टाकसाळ व्यवस्था**

ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यापासुन नागपूर राज्याची टाकसाळ जुन्याच पध्दतीनुसार चालु होती, पण नाल्यामध्ये बरीच मोठी भेसळ आढळल्यामुळे इ.स. १८२० च्या फेब्रुवारीमध्ये टाकसाळीच्या व्यवस्थानामध्ये बदल करण्यात आले.

नागपूरच्या रूपयाची तपाणी केल्यावर असे निदर्शनास आले की, जुन्याकाळात नाण्यामध्ये काही अंशी भेसळ होत होती. पण भेसळ किंवा मिश्रण अधिकृत असल्यामुळे त्याला भेसळ किंवा अपराध म्हणता येईल काय, याची शंकाच आहे. सुमारे २० वर्षापूर्वी १२१३ फसलीमध्ये प्यारेलाल सोनाराने टाकसाळीमध्ये, चांदीमध्ये दुय्यम धातूचे मिश्रण करण्याची पध्दत सुरू केली. त्यानंतरचे टाकसाळीच सोनार अशा प्रकारचे मिश्रण करीत होते. पण इंग्रजांच्या राजवटीत हे काम अधिक वैज्ञानिक पध्दतीने सुरू केले. कारण पूर्वीच्या सोनारांना तत्त्व चांगल्यापैकी समजले होते असे दिसत नाही.

आप्पासाहेबांच्या काळातच शुध्द चांदीचे प्रमाण ७४ रती वरून ७२ रती, पर्यंत कमी केले होते. पण त्यांच्या काळातील नाण्यात ६८ किंवा ६८१/२ रतीपेक्षा अधिक चांदी आढळत नाही. बऱ्याच काळापर्यंत या प्रकारची कोन्ही तक्रार केली नाही. बऱ्याच काळापर्यंत या प्रकाराची जाणीव झाली नाही. आप्पासाहेबांच्या राजवटीत शिवराम सोनार हा टाकसाळीचा कंत्राटदार होता. कॅप्टन गार्डनने १२२८ फसली ; इ.स.१८१८ मध्ये टाकसाळ ताब्यात घेतली. तीनपर्यंत शिवरामच्याच अखत्यारित टाकसाळ होते. गार्डनने टाकसाळ घेतल्यावर नारायण पंडित या मंत्र्याने शिवराम सोनाराची गार्डन जवळ शिफारस केल्याने त्यालाच टाकसाळीचे कंत्राटीवर कायम ठेवण्यात आले. प्रत्यक्ष टाकसाळ नारायण पंडिताचा मित्र रामजी तात्याकडे होती.

शिवराम सोनाराने टाकसाळीत वार्षिक ३५,००० रूपये नफा होण्याची हमी घेतली, आणि ७२ रतीचा रूपया चालविण नाहीतर शिक्षा करावी अशी कबुली दिली होती. २७ तरीपण मिश्रण चालूच होते. पण त्याचे प्रमाण मात्र कमी होते. मनभट उपाध्येच्या रूपयापेक्षा शिवरामच्या

रूपयात एकरती चांदी जास्त आढळते. नारायण पंडित रूपयाची तपासणी करून ते बरोबर असल्याचे अनेकदा सांगत होता. परंतु प्रत्यक्षात तो तपासणी करत नव्हता तेव्हा मिश्रण करण्यामध्ये त्याची हातमिळवणे होती की नव्हती हे सांगणे कठीण आहे.

इ.स. १८१८ ; १२२८ सलीच्या अखेरीस नागपूर शहराच्या संपूर्ण कस्टम शुल्काच्या कंत्राटाचा लिलाव झाला आणि तो कंत्राट दौलतराव शिंद्याचा वकील नरसिंह बल्लाळ याने घेतला. त्यांनी जुन्या रकमेपक्षा बरीच जास्त रक्कम देण्याचे कबूल केले. नरसिंहरार बल्लाळ याने ७२ रती चांदीची नाणी पाडण्याची लेखी कबुली दिली. नारायण पंडिताने पूर्वीप्रमाणेच सारा तपासणी सुरू राहील याचे आश्वासनाही दिले. तसेच नारायण पंडित टाकसाली जवळच महालात राहत होता; तर कॅटटन गार्डन सीताबर्डीवर राहत होता. शिवाय त्याला दसरीही कामे होती. ती म्हणजे तो रेसिडेंशीत सर्जन होता आणि राजाचा खजीना व राजवाडाही त्याच्या देखरेखी खाली होता. तसेच कॅप्टन गार्डनला चांदीचे मिश्रण तपासण्याचे ज्ञानही नव्हते. या परिस्थितीमध्ये नागपूर राज्याची टाकसाळ जुण्याच नियमानुसार चालू राहिली. एकदा नारायण पंडितास १/२ रतीचा फरक आढळला तो चुकून झाला असेल म्हणून त्याने सतत तपासणीसाठी आपला एक माणूस टाकसाळीत बसविला. यावेळी नागपूरच्या राज्यातील मद्रासी सैनिकाच्या वेतनासाठी नागपुरी रूपयाची मोठी मागणी होती. नागपुरला येणारे कंपनीचे रूपये टांकसाळीच्या कंत्राटदारास देऊन त्याचे नागपुरी रूपये पाडण्यात येत.[१]

**भेसळ उघडकीस**

डिसेंबर १८१९ मध्ये रेसिडेंट जेन्किन्स आणि कर्नल ॲडम्स हे गार्डन सोबत होशंगाबादला गेले असता हे तेथेच असताना फेब्रुवारी १८२० मध्ये रेसिडेंशी खजिण्याचा इंग्रज अधिकारी कॅप्टन बेल, यांनी टाकसाळीत भांडी बेसळ होत असल्याचे बातमी लागल्याचे कळविले. या प्रकाराला आळा घालण्यसाठी रेसिडेंट जेन्किन्स याने कॅप्टन गार्डनला ताबडतोब नागपूरला पाठविले. तसेच या प्रकारचे कसून चौकशी करण्याचे आदेश रेसिडेंट जेन्किन्सने दिले. या सर्व प्रकारास नरसिंह बल्लाळ आणि शिवराम सोनार हे जबाबदारी असल्याचे कॅप्टन गार्डनच्या निदर्शनास आले. नारायण पंडित व त्याचा साथीदारावर आरोप ठेवण्यास आले, पण ते सिध्द करता आले नाही. तरीपण भेसळ झाली हे सिध्द झाले. ते नारायण माहीत नसणे हे शक्यच नाही. सरकारशी पोतदार करार असल्यामुळे. नारायण पंडिताने नेमलेल्या तिवारीसिंग नावाच्या गुमास्त्यास शिक्षा करावी, कारण त्याने आपल्या कामाकडे अतिदुर्लक्ष केले, असे नारायण पंडिताचे म्हणणे होते. बऱ्याच काळापासून हे भेसळ चालू असावी. कारण टाकसाळीत भेसळ नाव्याचा साठा मिळावा. त्याची किंमत रू. १००९५६/७/६ होती.

नारायण पंडिताच्या सूचनेवरून शिवराम सोनार आणि नरसिंह बल्लाळ यांना इंग्रज अधिकाऱ्याचे स्वाधीन केले. शिवराम सोनाराजवळ नुकसान भरपाई देण्यासाठी कोणत्याही प्रकारची स्थावर जंगम संपत्तीच नव्हती. तेव्हा शेवटी नारायण पंडितानेच सर्व नुकसान भरपाई दिली. याचा अर्थ त्याला शिवराम सोनार आणि नरसिंह बल्लाळ यांच्या कडून थोडीफार रक्कम मिळाली असावी.[२]

यासर्व प्रकरणामुळे रेसिडेंट जेन्किन्सनी कॅप्टन गार्डन यास टाकसाळीच्या अखत्यारिवरून काढून त्याच्याजागी कॅप्टन टयूलास नेमले पुढे प्युलार छत्तीसगडमध्ये पाठविल्यावर त्याच्या जागी डॉ. वायलीला नेमले. त्यांनी नाणे तपासण्याची विद्या संपादन केली होती.

**टाकसाळीचे कर्मचारी**

टाकसाळीमध्ये काम करणारे कर्मचारी पुढीलप्रमाणे मासिक वेतनावर कार्यरत होते. डॉ. वायली टाकसाळीचे इंग्रज अधिकाऱ्यापैकी प्रमुख असून २० रू. वेतन होते; तसेच दोन पारखीस ३०-२५ रूपये मासिक वेतन होते आणि कोरीकाम करणार त्यास ३० रू. कमाविसदाराला ४० रू. मासिक वेतन तर दोन वरिष्ठ कारकून २० रू. मासिक, दोन कनिष्ठ कारकून यांना १२ रूपये एक बारिदार होता त्याला ४ रू. दोन कमेटी त्यांना ६ रू. एक मशालची होता त्याला ३ रूपये आणि देवपूजास ५ रूपये.

नगपूरकर भोसल्यांच्या काळात, त्यांच्या रूपयाचा ऱ्हास होत होता. आप्पासाहेबांच्या काळात तर या बाबीचा कळसच झाला. नागपूर रूपयाचा भाव इतर प्रांतिक रूपयांशी सतत बदलत होता. त्यामुळे सागर आणि जबलपूर क्षेत्र नर्मदा क्षेत्रात सैनिकांनी वेतन देण्याच्या अडचणी येत होत्या.

तेव्हा नागपुरी रूपयात सुधारणा करणे हे इंग्रजांना अत्यावश्यक वाटले.[३]

नागपुरी रूपयाची किंमत प्रमाणित करण्यासाठी मोठया प्रमाणात पारख केली. त्याचे मूल्य, वनज आणि परिवर्तनशीलता तपासली. या विषयावर कॅप्टन गार्डनने एक मेमोरेंडम लिहिला त्यात टाकसाळीच्या विविध पैलूविषयी माहिती मिळते. नागपूरच्या प्रमाणित रूपयास जरीपटका म्हणत त्याचे वनज ८३ रती असून त्यात ७२ रती चांदी आणि १२ रती मिश्रधातू असतो निरनिराळया काळातील नागपुरी रूपयाची पारख करून टाकसाळीची अंदाजे किंमत अधिक नाणे पाडण्यासाठी उपलब्ध धातूमध्ये मिश्रण करण्यासाठी शुध्द चांदीचे प्रमाण वगैरे ठरविण्यात आले. निरनिराळया जिल्हयातून आलेल्या हजार रूपयाच्या थैल्याची वेगवेगळी पारख करण्यात आली. त्यावरून सात प्रकारची नाणी प्रचारात असलेली दिसते.

१. रघुजीची नाणी २. अगनूलालची नाणी ३. रामजी तात्याची नाणी. ४. मनभटाची नाणी ५. शिवरामची नाणी ६. चांदा टाकसाळीची नाणी ७. जरीपटका नाणी. वेगवेगळया प्रकारच्या नाण्यात वेगवेगळे वजन आढळते. या नाण्याच्या धातूत शुध्द चांदी आणि मिश्रधातूचे प्रमाणही वेगवेगळे आढळते. या सर्व नाण्यापैकी नागपूर नाण्यात सर्वाधिक वैविध्य आढळते.[४]

नाणे समस्या - या समस्येवर गव्हर्नर जनरल याने आपल्या परिषदेत विचार केला आणि रेसिडेंट जेन्किन्सला पत्र लिहून विचारले की, स्थानिक नाण्यात सुधारणा किंवा फरूखाबाद रूपयाचे सार्वत्रिक प्रचलन करण्यासंबंधी आपले विचार कळवावे ब्रिटिश प्रदेशाच्या बाहेर ठेवलेल्या इंग्रज सैन्याचे वेतन देताना अडचणी येत असल्यामुळे हा प्रश्न अतिशय महत्वाचा होता. स्थानिक नाणि त्याच्या धातू मूल्यावर प्रचलित राहावी. या दृष्टिने हा विनिमय नियंत्रित करण्याची सरकारची इच्छा होती.[५]

नाणी सुधारणेत अनेक अडचणी होत्या, त्यापैकी सर्वात मोठी अडचण स्थानिक सरकार आणि स्थानिक टाकसाळीच्या कंत्राटदाराच्या स्वार्थाची किंवा अडचणीपणाची होती. त्या काळात सरकारला नाणे पाडण्याचा एकाधिकार नव्हता. नागपूर राज्यात सरकारी टाकसाळ आणि खासगी टाकसाळ हे दोन्ही प्रचलित होते. नागपूर रूपया आणि फर्रूखाबदीच्या रूपयाचे सरासरी ठरविणे पुरेशे नव्हते कारण नागपुरी रूपयाची किंमत वेळोवळी बदलत होती आणि त्याला काही स्थैर्यही नव्हते. त्यामुळे चालू नाण्याचे मूल्य अचूक ठरविले तरी भविष्यात त्याच्या किमती बदलणार नाही, याची काहीच हमी नव्हती.[६] नागपुरी नाण्याचा आकारही इतका ढोबळ होता की त्याच्यावरचा पूर्ण ठसासुध्दा दिसत नव्हता. कित्येकदा तो ठसा इतका अस्पष्ट होता की, कोणते नाणे आहे. हे ओळखणे कठीण जात होते. ब्रिटिश सैनिकाचे वेतन स्थानिक नाण्यात मिळाल्याने जे नुकसान होते त्या नुकसान भरपाई स्थानिक बाजारातील स्वस्ताईने होत होती. पण नाण्याच्या मूल्यातील उणिवेची भरपाई करण्यासाठी सर्वत्र स्वस्ताई नव्हती. युरोपियन अधिकाऱ्यांचे वेतन जास्त असल्यामुळे त्यांचे नुकसानही जास्त होत होते, या अडचणी आणि दोषावर यात करण्यासाठी गव्हर्नर जनरलने आपल्या कौन्सिलमध्ये धोरण ठरवून ते नागपूरच्या रेसिडेंट जेन्किन्सला कळविले. यानंतर नागपूरच्या टाकसाळीच्या रूपयात कलकत्ता फरूखाबाद रूपयाप्रमाणे १५७-५ ग्रेन चांदी राहील म्हणजे शुध्द चांदी आणि ११/२ मिश्रधातू राहील. नागपूरच्या टाकसाळीत हे प्रमाण कायम राहावे. यासाठी रेसिडेंट जेन्किन्स काळजी घेईल, सागर आणि नर्मदा प्रदेशासाठी जे नियम घालून दिले आहेत तेच नियम स्थानिक बदलानुसार नागपुरात लागू होईल.[७]

फर्रूखाबाद रूपयात १८० ग्रेन राहील. त्यात १६५ ग्रेन शुध्द चांदी आणि १५ ग्रेन मिश्रधातू राहील. नागपूरच्या रूपया चिन्हावरून स्वीकारण्या ऐवजी वर्तनाने स्वीकारण्याचा दिवस ठरवून द्यावा. रेसिडेंट जेन्किन्स जोपर्यंत दिवस ठरवत नाही तोपर्यंत फर्रूखाबादेच्या १०० रूपयाच्या वजनाने नागपुरी रूपये ९३.१४.१४ मानले जातील. या मुदतीनंतर नागपूरचे रूपये केवळ चांदी म्हणून स्वीकारले जातील व त्यांना ब्रिटिश प्रदेशाच्या नियमानुसार सर्व शुल्क व वरणावली लागतील. याप्रकारे इंग्रज सरकारने सागर नर्मदा क्षेत्रासाठी फर्रूखाबाद रूपयास वैद्य मुद्रा घोषित केले, व नागपूरच्या रेसिडेंटनेही याच प्रकारे रूपये पाडावे. असे निर्देश देण्यात आले. या निर्णयाची अमंलबजावणी कशी होते हे कळण्यासाठी नागपूरचे रेसिडेंट जेन्किन्सला समोरील

VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

रेसिडेंट वेळोवळी नागपूर टाकसाळीचे रूपये कलकत्यास पाठवावे, असाही आदेश देण्यात आला.[८]

**खराब नाण्याचे चलन रोखण्याचे उपाय :-**

खराब नाण्यावर बंदी घातली; तरी नाण्याचे विक्रीतीकरण चालूच राहिले. वैनगंगा जिल्हयातील अधीक्षकाला आढळले की, पोतदाराच्या निष्काळजीपणामुळे किंवा प्रोत्साहनामुळे तरी खराब नाण्याची चलती आहे. तुमसर या ठिकाणी १५ पोतदार होते धान्य खरेदी करणारे लोक आपले पैसे त्यांच्याजवळ ठेवून त्यांच्यामार्फत धान्य विक्रत्यांना पैसे देत असे. त्यामुळे खराब नाणी चलनात आणण्याची पोतदारांना संधी मिळत असे आणि त्यांच्याजवळ खराब नाणी कोणी जमा केले हे ठरविणे कठीणच होते.

यामुळे या जिल्हयाचा अधीक्षक कॅप्टन विल्किन्सनने सर्व पोतदारांचा अधिकार रद्द करून हरी पोतदार याला सर्व नाणी तपासून स्वीकारण्याचा व तपासलेल्या नाण्यावर चिन्ह अंकित करण्याचा अधिकार दिला. त्याच्या चिन्हाची नाणी परगण्याच्या खजिण्यात नाकारली गेली, तरी तो त्याची नुकसान भरपाई करेल. या प्रयोजनामुळे तुमसरच्या बाजारात खराब नाणी येणे बंद झाले. खराब नाणी चलनात चुकूनही आली तरी आपली नोकरी जाईल अशी हरी पोतदाराला भीती असल्यामुळे तो कसून तपासत असे आणि खराब नाणी चालविण्याच्या फायद्यापेक्षा नोकरीचा फायदा अधिक होता आणि प्रत्येक मानणाला सरकारी पोतदाराकडे जाण्याचा फायदा माहीत झाला.

परंतु समोर १२२६; इ.स. १२२६ मध्ये ही पध्दत सोडून अनेक पोददार नेमण्याची पध्दत पुन्हा सुरू झाली; त्यामुळे पुन्हा खराब नाणी चलणात आली. चलणात आली. पोतदारांचे पद अनेक लोकांना कंत्राटाने देण्यात आले. त्यामुळे पुन्हा खराब नाणी प्रचलनात येतील याची कॅप्टन विल्किन्सनली काळजी वाटू लागली. तेव्हा तुमसर येथे पोतदार नेमावा अशा अधीक्षकाच्या हस्तक्षेपाऐवजी वैनगंगा जिल्हयातील पाटील हा रयतेला पैसे देण्याचे काम करेल असे ठरले. रेसिडेंट जेन्किन्सने अधीक्षक कॅप्टन विल्किन्सनचा प्रस्ताव मंजूर करून प्रचलना खराब नाणी येण्याचे रोखले.[९]

**तांब्याच्या नाण्यात सुधारणा :**

चांदीच्या नाण्याप्रमाणे तांब्याच्या नाण्यातसुध्दा सुधारणा करणे आवश्यक होते. कारण तांब्याच्या पैशाचे जवन आणि त्याचा भाव सतत कमी होत होता. आप्पासाहेबाच्या काळात पैसा १२ मासांचा झाला होता. पैशाच्या सराफांच्या बदमाशीमुळे पैशाचा भाव आणखी कमी झाला होता आणि रूपया खरेदी करण्यास ४४.४५ पैसे लागू लागले. ही घसरण सतत सुरू राहिली आणि इ.स. १८२३ मध्ये रूपयाचा भाव ५७ पैसे झाला.[३७] त्यामुळे तांब्याचा पैसा स्थिर करण्यासाठी नवीन नाणे काढावयाचे ठरविले. नागपूर टाकसाळीचा प्रमुख डॉ. गार्डनस याने तांब्याच्या नाण्याच्या फायदा-तोटयाविषयी एक स्मृतिपत्र तयार करून रेसिडेंट जेन्किन्ससमोर सादर केले. त्यात डॉ. गार्डनने म्हटले की नवीन तांब्याच्या नाण्यामुळे होणारे फायदे तोटयापेक्षा बरेच अधिक आहे. तांब्याच्या नव्या नाण्यामुळे त्या सराफाजवळ तांब्याच्या जुन्या नाण्याचा साठा आहे. त्यांचे बरेच नुकसान होईल.[१०] नवीन नाणी सुरू केल्यामुळे जुनी नाणी मात्र चलनातून काढू टाकावे लागले त्यामुळे नवीन नाण्याची बातमी लागताच सर्व दलाल त्यांच्या जवळची जुनी नाणी बाहेर काढून टाकतील; त्यामुळे ही त्यांचे फारसे नुकसान होणार नाही आणि आतापर्यंत झालेल्या फायद्याचा विचार करता ते किरकोळ आहे. एका रूपयास एक आणा किंवा ६१/२ टक्के नुकसान होईल असा डॉ. गार्डन्सचा अंदाज होता.

रूपयाचा भाव ५७ पैसे होता या दाराने १२१११/२ पैशाला २१ रूपये चार आणे मिळत होते. पण १० माशाचा पैसा. अशा ५७ पैशाचे वजनाच्या तांब्याची किंमत एक नागपुरी मनाएवढी म्हणजे २० रूपये होती. म्हणजे सध्याचा नाण्याच्या २० रूपये विकल्यास मालकाला २० आणे किंवा सव्वा रूपयांचे नुकसान होते. म्हणजेच एका रूपयास एक आणा हे नुकसान सराफाने सोसावे; कारण तेच लोक सतत गरीब लोकांपासून स्वस्त दराने पैसे खरेदी करून पैशाची किंमत घटवीत असतात आणि अधिक भावाने विक्रेत्यास विकत असतात.

यामुळे पैशाचा सराफाला बराच फायदा होत होता. तांब्याचे नवीन नाण्याचे मजुरीच्या मूल्यात बदल होईल; पण जुण्या रूपयाची नव्या रूपयाशी तुलना करून त्या प्रमाणात

मजुरीत बदल करून त्याचे समाधान करता येईल. तसेच तांब्याच्या नवीन नाण्याचे बरेच फायदे आहेत प्रत्यक्ष पायदा सा की, सामान्य तांब्याची नाण्यावर पाच टक्के दराने नऊ हजार रूपये फायदा होईल. तांब्याच्या नवीन नाण्याचे वनज जुन्या नाण्यापेक्षा अधिक असल्यामुळे-ती नाणी एका रूपयास ५७ पैशा ऐवजी ४० पैसे दराने विकली जातील. त्यामुळे सरकारला १/५७ ऐवजी १/४० दराने वरील पैशाचा कर मिळेल. भाजी आणि .... सुध्दा याच प्रकारे फायदा होईल दारूच्या विक्रीत एका पैशाला जुन्याय दराने दारू विकत असता. त्यामुळे सरकारला पूर्वीपेक्षा अधिक पैसे मिळतील, यामुळे नवीन नाण्याचे होणारे फायदे त्यामुळे होणाऱ्या तोटयोपक्षा वरचढ आहेत.[११]

अशाप्रकारे ब्रिटिश शासन काळामध्ये रेसिडेंट जेन्किन्सनी आपल्या गव्हर्नर जनरलच्या सल्ल्याने आणि आपल्या इंग्रज अधिकारी अधीक्षक वगैरेच्या सहयाने टाकसाळीमध्ये होणारा भ्रष्टाचार चांदी आणि तांब्याच्या पैशामध्ये होणारे भेसळ यापासून बचाव करण्याचे प्रयत्न केले. शिवाय टाकसाळीच्या धोरणामध्ये परिवर्तन करून रूपया व पैशामध्ये शुध्दता आणण्याचे प्रयत्न केले. चलनामधील विविधता तपासून त्याला एका पध्दतीने तोडण्याचे प्रयत्न केले आणि प्रशासन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याचेही प्रयत्न केले.

**न्यायव्यवस्था**

नागपूर राज्यावर ब्रिटिशानी राजकीय अधिकार मिळविल्यावर त्यांनी आपल्या रेसिडेंटमार्फत न्यायव्यवस्थेमध्येसुध्दा आपला अधिकार गाजविला. ब्रिटिश रेसिडेंट रिचर्ड जेन्किन्सनी नागपूर शहरासाठी एक न्यायालय स्थापन केले. ;ब्पजल ब्वनतजद्ध त्याचे कार्यक्षेत्र नागपूर पुरते मर्यादित होते. पूर्वी नागपूर शहरातील महत्वाचे खटले राजासमोर जात होते. या शहर न्यायालयामध्ये रेसिडेंट जेन्किन्सचा विश्वासातील माणूस म्हणजे राजा रघुजी दुसऱ्याच्या बहिणीचा मुलगा गुजाबादादा गुजर आणि त्याला एक सन्मानीय व प्रामाणिक व्यक्ती सहायक म्हणून राहत होता. या न्यायालयात मालमत्तेबाबत सुनावणी होत असत; तसेच ५०० रूपये आणि त्यापेक्षा जास्त रकमेची सुनावणी या न्यायालयात होत असे. दुय्यम न्यायालयातील निवाडया विरूध्द अपील या न्यायालयात करता येत होती. शेवटी या न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द अपील रेसिडेंट जेन्किन्सकडे करता येत होती.[१२]

शहरातील कनिष्ठ न्यायालय, पोलिस अधीक्षकाच्या नियंत्रणाखाली होते. या न्यायालयात दरोग प्रमुख असून त्यांच्याकडे आलेल्या खटल्याची सुनावणी ऐकून तो निर्णय देई. या निर्णयाविरूध्द पोलिस अधीक्षकाकडे अपील करता येई आणि शेवटी नगर न्यायालयाकडेही अपील करता येत होती. या न्यायालयात ५०० रूपये पेक्षा कमी मालमत्तेबाबत असलेले खटले निवाडयाकरिता येत तसेच १०० रूपयापेक्षा कमी किमतीचे विवादही या न्यायालयात येत असत.[१३] शपथ घेऊन साक्ष घेतल्या जात असे.

**सारांश :-**

अश्या पध्दतीने नागपूरकर भोसल्यांच्या राजकारणातील टाकसाळ व्यवस्थेमध्ये परंपरागत पध्दतीला बदलुन व त्यामध्ये होत असलेल्या भेसळयुक्त चलनामध्ये सुध्दता आणण्याचे कार्य रेसिडेंट रिचर्ड जेन्किन्सनी वेगवेगळया अधिकारी पाठवून चलनामधील शुध्दता आणुन खराब नाण्याचे चलन रोखण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

**संदर्भ :-**


1) आर. एम. सिन्हा, The Bhonsla of Nagpur. The last phase P. 130
2) एम. सिन्हा, The Bhonsla of Nagpur. The last phase P. 123, 133
3) किता P. १३३
4) पी. पी. कुळकर्णी King of Bhonsla Rajas of Nagpur. P. 235
5) एन. आर. आर, खंड ४ लेख २०७-२१३
6) किता पृ. क्र. २०७-१३
7) किता खंड ४ लेख १३ पृ. क्र. २२०-२२२
8) अंधारे भारा. अ.से.सा.सु. (ति.र.भो.) पृ. २१
9) सिन्हा आर.एम. The Bhonsle of Nagpur the last Page 132
10) Foreign secret cons.- Date 5th September 1818 No. 18
11) Jinkins Report- Vol I P. 96
12) Jinkins Report- Vol I P. 9 (Supple 1827)
13) अंधारे भारा. अ.से.सा.सु. (ति.र.भो.) पृ. २१